# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा दिल्याबद्दल कोयासन विद्यापीठाकडून देवेंद्र फडणवीस यांचे आभार

By Devendra Fadnavis on August 22nd, 2023




कोया, 22 ऑगस्ट

दरवर्षी साजरी होते डॉ. आंबेडकर जयंती

महाराष्ट्र सरकारकडून कोयासन विद्यापीठाला भारतरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा प्राप्त झाल्याबद्दल विद्यापीठाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले असून, त्यासाठ एक 'लेटर ऑफ ॲप्रिसिएशन' दिले आहे.

कोयासन विद्यापीठाचे अध्यक्ष रे. सोईडा र्युषो यांनी हे पत्र दिले असून, त्यात ते म्हणतात, 2015 मध्ये महाराष्ट्र सरकारने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा कोयासन विद्यापीठाला दिला होता. तेव्हापासून दरवर्षी विद्यापीठात डॉ. आंबेडकर जयंती साजरी केली जाते. याबद्दल आम्ही त्यांचे अतिशय आभारी आहोत. भारत-जपान संबंध असेच वृद्धिंगत होत राहतील, अशा सदिच्छा सुद्धा त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

फोटो: सोबत लेटर ऑफ ॲप्रिसिएशन आणि 2015 यावर्षी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा अनावरणाचे छायाचित्र





Letter of Appreciation

The Hon. Mr. Devendra Fadnavis
The Deputy Chief Minister of Maharashtra, India

It was a great honour for Koyasan University to receive the statue of Dr. Ambedkar from the Government of Maharashtra through your kindness in 2015. Since then, the University has cherished the statue and has organised a commemoration ceremony every April to celebrate Dr. Ambedkar's birthday. We would like to express our deepest gratitude once again for your kind consideration and sincerely hope that the India-Japan friendship will continue forever.

22 August 2023

Rev. SOEDA Ryusho
President, Koyasan University
Soeda Ryusho